# १५ वा केंद्रिय वित्त आयोग

# १५ वा केंद्रिय वित्त आयोग निधी

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय पंविआ२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४ दि २६ जुन २०२०

- दि.१ एप्रिल, २०२० पासून १५ व्या केंद्रिय वित्त आयोगास प्रारंभ.
- कालखंड दि.१ एप्रिल,२०२० ते ३१ मार्च , २०२५.
- १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या बळकटीकरणासाठी निधी देण्यात येतो.
- हा संपुर्ण निधी ग्रामपंचायत स्तरासाठी ८० टक्के, जिल्हा परिषद स्तरासाठी १० टक्के व पंचायत समिती स्तरासाठी १० टक्के याप्रमाणे उपलब्ध होत आहे..

- केंद्र शासनाने निधी वितरीत करताना निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार खालीलप्रमाणे केली आहे.(प.स. व जि.प.स्तरासाठी)

| अ.क्र | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | जिल्हयाची ग्रामीण लोकसंख्या (सन २०११ च्या जनगणनेनुसार) | ९० % |
| २ | जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्रफळ | १० % |
| | एकूण | १०० % |

ग्रामपंचायत स्तरासाठी लोकसंख्येनुसार (सन 2011 च्या जनगणनेनुसार) १०० %

# 15 वा वित्त आयोगाच्या निधीतुन पंचायत राज संस्थानी करावयाच्या बाबी

**1. मुलभुत/बेसिक ग्रँट अबंधित (अनटाईड):-**

1.ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थानीकर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळुन इतर

2.स्थानिक गरजांनुसार (Location Specific Felt Needs) आवश्यक बाबींवर वापर करणेचा आहे.

**2.बंधित/ टाईड ग्रँट :-**

1.स्वच्छता आणी हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल दुरुस्ती

2.पेयजल पाणीपुरवठा,रेन वॉटर हार्वेस्टींग, वॉटर रिसायकलींग

| | प्रकार | | दिनांक | स्तरीय (80) | (10) | स्तरीय (10) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अबंधित निधी | 2020-21 (I) | 29 जुन 2020 | 47.979 | 5.9974 | 5.9974 | 59.9738 |
| 2 | बंधित निधी | 2020-21 (I) | 27 जुलै 2020 | 47.979 | 5.9974 | 5.9974 | 59.9738 |
| 3 | अबंधित निधी | 2020-21 (II) | 8 फेब्रु. 2021 | 47.979 | 5.9974 | 5.9974 | 59.9738 |
| 4 | बंधित निधी | 2020-21 (II) | 15 एप्रिल 2021 | 47.979 | 5.9974 | 5.9974 | 59.9738 |
| 5 | अबंधित निधी | 2021-22 (I) | 20 मे 2021 | 28.3708 | 3.5463 | 3.5463 | 35.4634 |
| 6 | बंधित निधी | 2021-22 (I) | 15 सप्टेंबर 2021 | 46.3161 | 5.3195 | 5.3195 | 56.9551 |
| 7 | अबंधित निधी | 2021-22 (II) | 13 एप्रिल 2022 | 30.996 | 3.5036 | 3.5036 | 38.0039 |
| 8 | बंधित निधी | 2021-22 (II) | 12 जुलै 2022 | 39.1852 | 4.7029 | 4.7029 | 48.591 |
| 9 | अबंधित निधी | 2022-23 (I) | 10 नोव्हेंबर 22 | 32.1258 | 0 | 0 | 32.1258 |
| 10 | बंधित निधी | 2022-23 (I) | 18 नोव्हेंबर 22 | 48.1891 | 0 | 0 | 48.1891 |
| 11 | अबंधित निधी | 2022-23 (II) | 29 मार्च 2023 | 31.8111 | 0 | 0 | 31.8111 |
| 12 | बंधित निधी | 2022-23 (II) | 6 एप्रिल 2023 | 47.721 | 0 | 0 | 47.721 |
| **एकूण** | **बंधित निधी** | | | **277.3694** | **22.0172** | **22.0172** | **321.4038** |
| | **अबंधित निधी** | | | **219.2617** | **19.0447** | **19.0447** | **257.3518** |
| **एकूण एकंदर** | | | | **496.6311** | **41.0619** | **41.0619** | **578.7556** |

# Panchayat samiti level 15 th Finance report (Block wise)

( Rs in lakhs)

| Sr NO | Block | TOTAL RECEIPT | TOTAL EXPENDUTURE | EXPENDUTURE% |
|---|---|---|---|---|
| 1 | Gaganbavda | 54.30 | 25.85 | 47.60 |
| 2 | Chandgad | 265.65 | 144.75 | 54.49 |
| 3 | Ajra | 155.46 | 90.27 | 58.07 |
| 4 | Radhanagari | 298.42 | 183.72 | 61.56 |
| 5 | Karvir | 724.67 | 486.3 | 67.11 |
| 6 | Shahuwadi | 270.99 | 196.84 | 72.64 |
| 7 | Shirol | 433.27 | 319.52 | 73.75 |
| 8 | Hatkanangle | 668.60 | 499.91 | 74.77 |
| 9 | Kagal | 342.33 | 265.03 | 77.42 |
| 10 | Gadhinglaj | 287.12 | 243.77 | 84.90 |
| 11 | Bhudargad | 225.11 | 195.25 | 86.74 |
| 12 | Panhala | 381.29 | 378.52 | 99.27 |
| | Total | 4106.20 | 3029.73 | 73.78 |

# GP level 15 th Finance report (Block wise)

(Rs In Crores)

| Sr NO | **Block** | TOTAL RECEIPT | TOTAL EXPENDUTURE | EXPENDUTURE % |
|---|---|---|---|---|
| 1 | Gadhinglaj | 34.50 | 12.67 | 36.72 |
| 2 | Ajra | 18.40 | 7.42 | 40.32 |
| 3 | Radhanagari | 35.43 | 14.84 | 41.89 |
| 4 | Kagal | 41.21 | 19.53 | 47.39 |
| 5 | Shahuwadi | 34.02 | 16.48 | 48.44 |
| 6 | Panhala | 45.01 | 22.68 | 50.39 |
| 7 | Gaganbavda | 6.41 | 3.33 | 51.97 |
| 8 | Bhudargad | 26.87 | 14.29 | 53.19 |
| 9 | Karvir | 86.91 | 46.59 | 53.60 |
| 10 | Shirol | 51.72 | 27.79 | 53.74 |
| 11 | Hatkanangle | 80.73 | 44.06 | 54.57 |
| 12 | Chandgad | 31.67 | 24.63 | 77.77 |
| | | 496.63 | 278.96 | 56.17 |


# प्राप्त निधी व खर्च

(रू कोटीत)

| अ.क्र | स्तर | प्राप्त निधी | खर्च | शिल्लक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिषद (10%) | 41.06 | 30.63 | 11.10 | 74.61 |
| 2 | पंचायत समिती (10%) | 41.06 | 30.30 | 10.76 | 73.79 |
| 3 | ग्रामपंचायत (80%) | 496.63 | 278.96 | 217.67 | 56.17 |
| | एकूण | 578.75 | 339.89 | 239.54 | 58.73 |


# संकल्पनाधारीत (Thematic) ग्रामपंचायत विकास आराखडा

# संकल्पना निवड




सशक्त पंचायत सतत् विकास

# संकल्पना निवड



स्वनिधी व इतर निधी
बंधित निधी
अबंधित निधी
स्वनिधीमधून राखीव निधी
संबधित योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार
५० टक्के ग्रामसभेने निवडलेल्या एक किंवा दोन संकल्पना
५० टक्के कोणत्याही संकल्पना
ग्रामसभेने निवडलेल्या एक किंवा दोन संकल्पना मधील समाविष्ट असलेल्या कमीत कमी ५० टक्के उपक्रमावर तरतूद करणे बंधनकारक

# ई-ग्राम स्वराज पोर्टल –निधीचे वर्गीकरण

ग्रामसभेने मंजुर केलेला ग्रामपंचायत विकासआराखडा ई-ग्राम स्वराज पोर्टल वर अपलोड करताना, आराखड्यासाठी उपलब्ध होणारा निधी बंधित व अबंधित निधी मध्ये भरावयाचा आहे.

## अ) बंधित निधी –

१.पंधराव्या वित्त आयोगाचा 60 % ( 30 % पाणीपुरवठा व 30 % स्वच्छता ) बंधित निधी,

२. स्वनिधीतील अ)15 % मागासवर्गियांसाठी,

ब)10 % महिला व बालकल्याण,

क) 5 % दिव्यांग कल्याण,

ड) 35 % प्रशासनासाठी निधी आणि

३. केंद्र, राज्य व जि.प. च्या इतर खात्याकडून ग्रामपंचायती साठी मंजूर असलेल्या योजना /उपक्रम/ कार्यक्रमासाठी (जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, इ.) मंजुर निधी

४. स्थानिक विकास कार्यक्रमातुन (खासदार,आमदार निधी )

सशक्त पंचायत सतत् विकास

# ई-ग्राम स्वराज पोर्टल –निधीचे वर्गीकरण

ब) अबंधित निधी -

१. पंधराव्या वित्त आयोगाचा 40 % अबंधित निधी,

२. स्वनिधीतील वर नमूद बंधित निधी वगळता उर्वरित सर्व निधी,

३.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विकास कामांसाठी आराखड्यानुसार प्राप्त होणारा निधी,

४.बक्षिसे व पारितोषिके यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मिळणारा निधी,

५. आदिवासी विभागाकडून पेसा गावांना मिळणारा 5 % अबंध निधी,

६.लोकवर्गणी व लोकसहभागातुन उपलब्ध होणारा निधी.

सशक्त पंचायत सतत् विकास

# संकल्पना निहाय उपक्रम संख्या

| अ.क्र. | संकल्पना | ई-ग्रामस्वराज मधील उपक्रम संख्या |
|---|---|---|
| १. | गरिबी मुक्त गाव (Poverty free Village) | ३९ |
| २. | आरोग्यदायी गाव (Healthy Village) | ५० |
| ३. | बाल स्नेही गाव ( Child-friendly Village) | ४८ |
| ४. | जलसमृध्द गाव (Water Sufficient Village) | ५० |
| ५. | स्वच्छ व हरित गाव (Clean and Green Village) | ८१ |
| ६. | स्वयंपूर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव (Village with Self-sufficient Infrastructure ) | ९६ |
| ७. | सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव (Socially Secured Village) | ३३ |
| ८. | सुशासन युक्त गाव (Village with Good Governance) | ३१ |
| ९. | महिला स्नेही गाव (Women Friendly Village) | ३९ |
| | | ४०७ |

सशक्त पंचायत सतत् विकास

जिल्हा परिषद
विकास
आराखडा

शासन निर्णय बिपीडीपी-२०२१/प्र.क्र.२१/पं.रा-६, दि.०१ नोव्हेंबर, २०२१

पंचायत समिती
विकास आराखडा

# जिल्हा परिषद
# विकास आराखडा

# जिल्हा परिषद नियोजन समिती

| अ .क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | जिल्हा परिषद उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | मुख्य  कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४ | सर्व क्षेत्रिय कार्यकारी गटांचे अध्यक्ष | सदस्य |
| ५ | दोन जिल्हा परिषद सदस्य<br>(जिल्हा परिषद अध्यक्ष यांचे मान्यतेने) | सदस्य |
| ६ | जिल्ह्यातील  सर्व पंचायत समितीत्यांचे सभापती | सदस्य |
| ७ | जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक सरपंच<br>(जिल्हा परिषद अध्यक्ष यांचे मान्यतेने) | सदस्य |
| ८ | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य |
| ९ | विभागीय वन अधिकारी | सदस्य |
| १० | एमएसआरएलएमचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य |
| १२ | कृषी उत्पन्न पणन समितीचे अध्यक्ष | आमंत्रित |
| १३ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | आमंत्रित |
| १४ | एक स्वच्छता तज्ञ | आमंत्रित |
| १५ | एक अर्थशास्त्रचे  प्राध्यापक | आमंत्रित |
| १६ | जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख | सदस्य |
| १७ | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. | सदस्य सचिव |

# जिल्हा परिषद नियोजन समितीची कामे

- जिल्ह्यातील दीर्घकालीन विकासाचा दृष्टीकोन विकसित करण्यासाठी जिल्हा परिषद आणि क्षेत्रीय कार्यकारी गटांना सहाय्य करणे.
- सर्व क्षेत्रीय कार्यकारी गटांचे अहवाल विचारात घेऊन प्रारुप जिल्हा परिषद विकास आराखडा तयार करणे.
- विकास क्षेत्राच्या विकासा संदर्भात निरोगी विचार विनिमयास प्रोत्साहित करणे.
- प्रकल्प तयार करण्यासाठी क्षेत्रीय कार्यकारी गटांना सहाय्य करणे.
- अतिरिक्त संसाधन जमा करण्याच्या  शक्यतांचा शोध घेणे.
- वेळापत्रकानुसार उपक्रमाची अमंलबजावणी होईल यासाठी योग्य समन्वय राखणे.
- क्षेत्रीय कार्यकारी गटांच्या उपक्रमांचे संयोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेला सहाय्य करणे.
- प्रकल्प नियोजनासाठी योग्य अभ्यास करणे व जिल्हा परिषदेला अहवाल देणे.
- भागधारकांना बँक आणि सहकारी संस्थांशी चर्चा करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- जिल्हा परिषदेच्या नियोजन प्रक्रियेस सहाय्य करण्यासाठी तज्ञ, स्वयंसेवक, शैक्षणिक, तांत्रिक संस्था शोधणे.

# जिल्हा परिषद विकास आराखडा - प्रक्रिया

- क्षेत्रीय कार्यकारी गटांची स्थापना

१. लोकप्रशासन, वित्त आकडेवारी आणि नोंदी, कारभार सुधारणा

२. प्रक्रिया व विपणन (मत्स्यपालन, रोजगार हमी योजना, मृद व जलसंधारण, पर्यावरण संरक्षण, कृषि उत्पादनांचा साठा )

३. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यपालन

४. आर्थिक विकास आणि उत्पन्न निर्मिती, लहान व सूक्ष्म उद्योग व्यवसाय संस्था इ.

५. गरीबी निर्मूलन आणि कौशल्य विकास (गृहनिर्माण)

६. सामाजिक न्याय दिव्यांग, वृद्ध लोक, मुले, ट्रान्सजेंडर इत्यादी

७. महिला विकास

८. अनुसूचित जाती व जमातींचा विकास

९. आरोग्य आणि पोषण

१०. पिण्याचे पाणी आणि स्वच्छता

११. शिक्षण, कला आणि विकास आणि युवा कल्याण

१२. सार्वजनिक कामे (वीज आणि उर्जेसह)

# जिल्हा परिषद क्षेत्रीय कार्यकारी गटाची रचना

| | | |
|---|---|---|
| १. | विषय समितीचे सभापती | - अध्यक्ष |
| २. | विषय समितीचे सभासद | - सदस्य |
| ३. | कार्यकारी गटांस सोपविलेल्या विषयातील कमीत कमी एक तज्ञ | - सदस्य |
| ४. | एक पंचायत समिती सदस्य ( सभापती यांचे मान्यतेने) | - सदस्य |
| ५. | कार्यकारी गटांस सोपविलेल्या विषयामध्ये उत्कृष्ट कार्य केलेला जिल्ह्यातील एक सरपंच ( सभापती यांचे मान्यतेने) | - सदस्य |
| ६. | विषय समितीचे सचिव | - सदस्य सचिव |

- क्षेत्रीय कार्यकारी गटांच्या सूचक यादीतील काही विषय हे सध्या कार्यरत जिल्हा परिषद विषय समित्यांशी संबधित नसल्यास त्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या मान्यतेने त्या विषयामध्ये आवड असणा-या जिल्हा परिषद सदस्यास क्षेत्रीय कार्यकारी गटाचे अध्यक्ष करुन इतर सदस्यांची व सदस्य सचिवाची निवड करून गट स्थापन करावा.

# जिल्हा परिषद स्तरावर नियोजनासाठी उत्पनाचे स्त्रोत.

- १५ वा वित्त आयोग अनुदान
- राज्य वित्त आयोग अनुदान
- जिल्हा परिषदेचा स्वनिधी (जिल्हा परिषद सेस निधी)
- केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणारा निधी /अभिसरण निधी
- सी.एस.आर. फंड (CSR Fund)
- लोकसहभाग (रोख, श्रमदान, देणगी इ. )

# जिल्हा परिषद स्तरावरील नियोजनाची महत्वाकांक्षी क्षेत्रे

- ७३ व्या घटनादुरुस्ती मधील ११ व्या परिशिष्टामध्ये सूचीबद्ध केलेल्या २९ विषयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे .
- १५ व्या वित्त आयोगाने प्राधान्यक्रम म्हणून ठरविलेल्या स्वच्छता व पाणी या क्षेत्रांव्यतिरिक्त जिल्हा परिषदांनी आर्थिक विकास, मानव विकास, शाश्वत विकासाची ध्येये, सामाजिक न्याय, कृषी, शिक्षण, आरोग्य, महिलांशी संबंधित बाबी, दिव्यांग व असुरक्षित घटक आणि वृद्ध व दुर्बल यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.
- जिल्हा परिषदेच्या विविध प्रकारच्या मालमत्तेची देखभाल व दुरुस्ती.
- ज्या ठिकाणी नैसर्गिक संभाव्यता आहे अशा ठिकाणी ग्रामीण उद्योगाचे केंद्र उभारणे आवश्यक आहे.
- औद्योगिक केंद्र विशेषतः महिलांना साहाय्यभूत असावे.
- पाणी पुरवठ्यासाठी मोठ्या योजना, धरणाचे/जलाशयाचे बांधकाम, स्वच्छतेसाठी यंत्राचा वापर, आधुनिक पद्धतीने घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मृद व जलसंधारण, पर्यावरण संवर्धन इत्यादी बाबी जिल्हा परिषद विकास आराखड्यात समाविष्ट करता येतील.

# जिल्हा परिषद विकास आराखड्यास मान्यता

- विविध विषयांच्या क्षेत्रिय कार्यकारी गटाकडून प्राप्त झालेल्या अहवालांचे एकत्रीकरणाचे सादरीकरण करून , त्यावर सविस्तर चर्चा झाल्यावर, प्राधान्यक्रम निश्चित करून जिल्हा परिषद नियोजन समिती मध्ये प्रारूप जिल्हा परिषद विकास आराखडा तयार केला जाईल.
- आराखड्यात क्षेत्रनिहाय योजना आणि राज्य शासनाच्या इतर विभागासह अभिसरण असावे.
- प्रारूप आराखड्याची छाननी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येईल .
- त्यानंतर जिल्हा परिषद विकास आरखड्यास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये अंतिम मान्यता देण्यात येईल.

# देखरेख यंत्रणा

- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर जिल्हा परिषद विकास आराखडा कार्यान्वित होईल.
- आराखड्याची अंमलबजावणी, प्रगती व कामाच्या गुणवत्तेवर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मासिक बैठकीत नियमितपणे प्रगतीचा आढावा घेण्यात यावा.
- योजनांच्या अंमलबजावणीत आढळलेल्या अडचणी शक्यतो जिल्हा स्तरावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोडवाव्यात.

# जिल्हा परिषद विकास आराखड्यात बदल

- जिल्हा परिषद विकास आराखड्यातील कोणत्याही कामामध्ये बदल विभागीय आयुक्त यांच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाही.

- विभागीय आयुक्त यांनी जिल्हा परिषद ने दिलेली कारणमिमांसा विचारात घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा. याबाबत विभागीय आयुक्त यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

# सर्वांची योजना, सर्वांचा विकास

# "PEOPLE'S PLAN CAMPAIGN"

# PPC चे उपक्रम

- GPDP साठी खालील बाबींची नोंद GPDP पोर्टलमध्ये करणे.

  1. नोडल अधिकारी (राज्य, जिल्हा व तालुका)
  2. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये Facilitator
  3. Frontline Workers (सर्व विभाग)
  4. विशेष ग्रामसभांचे आयोजन व दोन्ही ग्रामसभांचे वेळापत्रक
  5. Public Information Board लावून त्यावे Geo-tagged Photographs

- ग्रामपंचायत विकास आराखडा बनविण्याची प्रक्रिया सुरू करणे- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेपूर्वी महिला सभा, वॉर्ड सभा, बाल सभा व वंचित घटकांच्या सभांचे नियाजन करणे.
- पहिल्या ग्रामसभेमध्ये प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडयास मान्यता घेणे.
- प्रारूप आराखडा व उपक्रम निहाय प्रकल्प अहवाल तालुका तांत्रिक छाननी समितीकडे पाठविणे.
- दुस-या ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडयास अंतिम मान्यता घेणे.
- ग्रामसंभेमध्ये अंतिम करण्यात आलेला ग्रामपंचायत विकास आराखडा eGramSwaraj पोर्टलमध्ये अपलोड करणे.